महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९९ वा | दिनांक : २७/०९/२०२५ | वार : शनिवार

## ओबीसी समाजाचा बीडमधील उद्याचा मेळावा स्थगित



**मुंबई :** ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात ओबीसी बांधवांना मार्गदर्शन करण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व सकल ओबीसी समाजाच्या वतीने 28 सप्टेंबर रोजी बीड येथे महामेळावा आयोजित करण्यात आलेला होता. या परिसरात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर प्रथम शेतकऱ्यांना मदत व्हावी यादृष्टीने हा महामेळावा काही कालावधीसाठी स्थगित करण्यात करण्यात येत असल्याची माहिती अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

मंत्री छगन भुजबळ यांनी याबाबत व्हिडिओद्वारे ओबीसी बांधवांना माहिती दिली आहे. तसेच प्रथमतः अतिवृष्टी बाधीत शेतकऱ्यांना मदत करण्याचे आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सकल ओबीसी समाज बांधवांना केले आहे.

यामध्ये मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे की, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आणि सकल ओबीसी समाज यांच्याकडून बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर 28 सप्टेंबर रोजी हा ओबीसी महामेळावा आयोजित करण्यात आला होता. राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेट लागू केलं. या निर्णयामुळे ओबीसी आरक्षण संपले या भीतीने राज्यभरातील 14/15 तरुणांनी आपले जीवन संपविले. याबाबत ओबीसी बांधवाना योग्य माहिती व मार्गदर्शन मिळावे यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी सकल ओबीसी बांधवांनी विशेष मेहनत देखील घेतली. परंतु राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि विशेषतः बीड शहर व जिल्ह्यामध्ये झालेली अतिवृष्टी व शेतकऱ्यांच्या प्रचंड नुकसानामुळे हा मेळावा पुढे ढकलण्यात आला असून त्या मेळाव्याची तारीख लवकरच जाहिर करण्यात येईल अशी माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

त्यांनी पुढे म्हटले आहे की, गावागावातून अनेक कार्यकर्ते या मेळाव्याची जनजागृती गेल्या आठ दिवसांपासून करत होते. या महासभेत आपण सरकारने 2 सप्टेंबरला जो जीआर काढला त्यातून कसे ओबीसींचे काय नुकसान होतंय, तो जीआर काय आहे, त्यातील शब्दरचना कशी चुकीची आहे, ती ओबीसींवर अन्याय करणारी आहे या सगळ्या गोष्टी आपण या मेळाव्यातून सांगणार होतो. गेली दहा पंधरा दिवसांपासून महाराष्ट्रात पावसाचे थैमान सुरु आहे. अनेक ठिकाणी महापूर आला आहे. शेतं, गुरं-ढोरं वाहून गेली आहेत. शेतकरी संकटात आहे. अनेकजण मृत्यूमुखी पडले आहेत. बीड शहरात सुद्धा प्रचंड पाऊस पडतो आहे. आपण महासभेसाठी वॉटरप्रुफ मंडपही उभारला होता. परंतु मंडपात गुडघाभर पाणी आहे अशी माहिती मला तेथील कार्यकर्ते सुभाष राऊत यांनी मला कळवले आहे. त्यामुळे सध्यस्थितीत हा महामेळावा आपण पुढे ढकलूया. पावसाचा जोर कमी झाल्यानंतर मेळावा घेऊ अशी माहिती भुजबळांनी दिली आहे.

तोपर्यंत सर्व कार्यकर्त्यांना विनंती आहे, की, अतिवृष्टीमुळे जे शेतकरी अडचणी आले आहेत त्यांची मदत करा, त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा. शेवटी शेतकरी जगला तरच हे जग जगणार आहे. म्हणून आपण सगळ्यांनी शेतकऱ्यांसाठी मदत करुया असे आवाहन भुजबळांनी समता परिषद कार्यकर्त्यांना केले.

## शेवाळा गावात कयाधू नदीचे पाणी शिरले : २५ कुटुंबाचे जिल्हा परिषद शाळेत स्थलांतर



**हिंगोली :** हिंगोली जिल्ह्यांमध्ये शनिवारी ता 27 सायंकाळी उशिरापर्यंत कमी अधिक प्रमाणात पाऊस सुरू असून कळमनुरी तालुक्यातील शेवाळा येथील २५ कुटुंबाचे जिल्हा परिषद शाळेत स्थलांतर करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते यांच्या पथकाने या परिसरात भेट देऊन पाहणी केली आहे.

हिंगोली जिल्ह्यांमध्ये मागील २४ तासापासून सुरू असलेला पाऊस शनिवारी सायंकाळी उशिरापर्यंत कायम आहे. या पावसामुळे जिल्हाभरात मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आहे. वसमत, औंढा नागनाथ, कळमनुरी तालुक्यातील काही गावांमध्ये पावसाची पाणी शिरले आहे. याशिवाय काही घरांनाही मोठा फटका बसला आहे.

वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे येथील चोरतलावाला भेगा पडू लागल्या असून त्यामुळे तलावाची पाणी गावात शिरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या सूचनेनंतर जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रियंका राजपूत यांनी तातडीने लघु सिंचन विभागाचे पथक पांगरा शिंदे येथे रवाना केली आहे. त्या ठिकाणी तलावाची पाहणी केली जात आहे.

दरम्यान कळमनुरी तालुक्यात काय कयाधू नदीचे पाणी धोक्याच्या पातळीवरून वाहत आहे. कळमनुरी तालुक्यातील चिखली, डोंगरगाव पूल या भागात उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते, तहसीलदार युवक कुमार कांबळे, मंडळ अधिकारी आनंद काकडे, ग्राम महसूल अधिकारी विशाल पतंगे, कृषी सहाय्यक सचिन वाघमारे, कर्मचारी अंकुश कुलाते, संतोष मुधोळ यांच्या पथकाने ठिकठिकाणी भेटी देऊन पाहणी केली आहे.

शेवाळा येथे कयाधू नदीचे पाणी गावात शिरल्यामुळे २५ कुटुंबाचे जिल्हा परिषद शाळेत स्थलांतर करण्यात आले आहे. याशिवाय काही कुटुंबांनी नातेवाईकांच्या घराचा आसरा घेतला आहे. कयाधू नदीच्या परिसरातील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करा : अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर 'बामुक्टो'ची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात भयंकर अतिवृष्टी झालीय. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरसह बीड, लातूर, धाराशिव, जालनासह इतर जिल्ह्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली. त्यामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले. हे पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ परीक्षा शुल्क माफ करा, अशी मागणी प्राध्यापक संघटनेने केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि महाविद्यालयीन प्राध्यापक संघटनेने (बामुक्टो) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही मागणी केलीय. 'बामुक्टो'ने उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव आणि राज्याच्या मुख्य सचिवांकडेही हीच मागणी केलीय. आता यावर काय निर्णय होणार, हे पाहावे लागेल.

'बामुक्टो'ने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक निवेदन पाठवले आहे. त्यात म्हटले आहे की, यंदाच्या मान्सून हंगामात मराठवाडा विभागात जून ते सप्टेंबर 2025 या कालावधीत साधारणपणे एक हजार मिलीमीटर पेक्षाही अधिकचा पाऊस झाला. आमच्या विद्यापीठ परीक्षेत्रात येणाऱ्या छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, बीड व जालना जिल्ह्यातील बहुतांश महसुली मंडळात अतिवृष्टीमुळे भीषण पुरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सदरील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पीके पूर्णपणे पाण्याखाली गेली असून खरीप हंगामातून मिळणारे उत्पन्न बुडाले आहे. त्यामुळे या परिस्थितीचा थेट परिणाम शेतकरी व कामगार कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर झाला आहे.

'बामुक्टो'ने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवदेनात पुढे म्हटले आहे की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठ परीक्षेत्रातील उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाचे नियमित खर्च भागविणे अवघड झाले आहे. विशेषतः विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या हिवाळी-2025 सत्र परीक्षेचे शुल्क भरणे विद्यार्थ्यांना शक्य होणार नसून याचा परिणाम त्यांच्या एकूणच शिक्षणावर होणार आहे. उपरोक्त परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून, मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे विभागातील अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालायतील विद्यार्थ्यांचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यापीठ परीक्षा शुल्क माफ माफ करावे ही नम्र विनंती.' निवेदनावर 'बामुक्टो'चे विभागीय अध्यक्ष प्रा. डॉ. बप्पासाहेब म्हस्के आणि सचिव प्रा. डॉ. मारोती तेगमपुरे यांच्या सह्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५


## मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेत आमदार मा. अनुराधाताई चव्हाण यांच्या उपस्तितीत भव्य विज्ञान प्रदर्शनाचे उदघाट्न



**छत्रपती संभाजीनगर :** अगस्त्या इंटरनॅशनल फौंडेशन कडून भव्य विज्ञान प्रदर्शन मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेत आदरणीय आमदार श्रीमती अनुराधाताई अतुल चव्हाण यांच्या उपस्थितीत पार पडला. सदरील प्रदर्शन मध्ये विविध विभाग करण्यात आली होती त्यामध्ये वनस्पती विभाग, अगस्त्या उपकरण विभाग, जादुई विभाग करण्यात आली होती या प्रदर्शनासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते. या प्रसंगी आदरणीय मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी सर यांनी मार्गदर्शन करून अगस्त्या फौंडेशनचे आभार मानले.तसेच या प्रदर्शनासाठी शाळेच्या विज्ञान शिक्षिका श्रीमती मयुरी इंगळे मॅडम व चिंचोलीकर मॅडम यांचे विशेष सहकार्य लाभले.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## कन्नड तालुक्यात सकल आदिवासी समाजाच्या वतीने आदिवासी आरक्षण बचाव एल्गार मोर्चा



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** कन्नड तालुक्यात दिनांक 25 सप्टेंबर 2025 रोजी हजारोंच्या संख्येने सकल आदिवासी समाजाच्या वतीने आदिवासी आरक्षण बचाव एल्गार मोर्चा काढण्यात आला त्यांच्या प्रमुख मागण्या १)अनुसूचित जमातीच्या यादीत बंजारा धनगर व कोणत्याही समाजाचा समावेश करू नये २)आमदार व खासदार बंजारा धनगर समाजाला पाठिंबा देतात त्यांच्यावर लोकप्रतिनिधी कायद्यानुसार कारवाई करावी ३) ST-A, ST-B अशा प्रकारे (भाग) वर्गीकरण करू नये ४) बंजारा धनगर व इतर समाजाला (ST) प्रवर्गात समाविष्ट करण्याचे शिफारस पत्र देणाऱ्या आमदार खासदार व इतर लोकप्रतिनिधींचा जाहीर निषेध या मोर्चाला गिरणी मैदानापासून सुरुवात केली त्या मोर्चात आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं आदिवासी एकजुटीचा विजय असो या सरकारचं करायचं काय खाली मुंडकं वरती पाय, एक तीर एक कमान सारे आदिवासी एक समान या घोषणांनी सारी कन्नड नगरी दुमदुमली होती पांडू कडाळे यांनी राया ठाकर विर एकलव्य राघोजी भांगरे बिरसा मुंडा महात्मा फुले डॉ बाबासाहेब आंबेडकर तंट्या भिल भागोजी नाईक नाग्या कातकरी या क्रांतिवीरांना आणि महापुरुषांच्या विचारांना अभिवादन करून पुढील वक्तव्य सुरू केले आदिवासींचा हक्क वाचवण्यासाठी हा एल्गार मोर्चा काढण्यात आला आहे शासनाने सुद्धा सरकारला कळवावे की आदिवासी काही कमी नाही बाबासाहेब आंबेडकरांनी जे आम्हाला दिले आहे त्यात आम्ही समाधानी आहोत आम्ही कुणाचे आरक्षण मागत नाही आणि आमचे आरक्षण कोणत्याही समाजाने मागू नये. आदिवासी समाज कोणाच्या थाटात खात नाही पण आदिवासींच्या थाटातलं दुस-यांनी खाऊ नये SC,ST समाजाला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून दिलेलं आहे हे आरक्षण कोणी कमी करू शकत नाही कोणी घुसखोरी करू शकत नाही तरी आपण झोपायचं नाही लढायचं सरकारला दाखवून देऊ की आदिवासी जमाती कोण आहे तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी मिटलं नाही तर मुंबईला जाऊ पण बंजारा धनगर व इतर जातींना आरक्षण मिळवून देणार नाही एस टी प्रवर्गात घुसू देणार नाही अशी ठाम भूमिका पांडु कडाळे यांनी मांडली. तसेच शिवाजीराव ढवळे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर राघोजी भांगरे बिरसा मुंडा महात्मा फुले विर एकलव्य सावित्रीबाई फुले या क्रांतिवीरांना महापुरुषांचे विचारांना अभिवादन करून आदिवासी समाजाला एकजूट व्हावे लागेल आणि लढा द्यावा लागेल आदिवासी विकास मंत्री व देशाची राष्ट्रपतींनी आदिवासींना ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिना च्या शुभेच्छा दिल्या का? असा सवाल उपस्थित केला आम्ही कुणाचं आरक्षण मागत नाही आणि आमचं आरक्षण कोणत्याही समाजाने मागू नये बंजारा धनगर समाजाला पाठिंबा देणाऱ्या आमदारांचा जाहीर निषेध केला असंवैधानिक मार्गाने एखाद्या राज्य सरकारला पत्र देऊन समाजा- समाजामध्ये संघर्ष निर्माण करण्यासाठी ही लोकं कारणीभूत ठरतात त्यांच्यावर ॲट्रॉसिटी चा गुन्हा दाखल झालाच पाहिजे व संजना ताई जाधव कन्नड मतदारसंघातील आमदार यांच्यावर गुन्हा दाखल झालाच पाहिजे असे एकलव्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शिवाजीराव ढवळे यांनी चांगलेच ठणकावून सांगितले धनगर बंजारा समाजाला सत्ताधारांनी काम दिलं आहे समाजा- समाजात भांडणं लावण्याचा भाजप सरकारचा अजेंडा आहे असे वक्तव्य सुद्धा केले याप्रसंगी बोलताना म्हणाले की 1950 साली राष्ट्रपतींनी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने संविधानाने दिलेल्या अधिकारात अनुसूचित जाती जमातींचं आरक्षण दिलेलं आहे भारतीय संविधानाच्या कलम 342 नुसार महाराष्ट्र राज्यातील क्षेत्र संबंधीत दिनांक 6 सप्टेंबर 1950 रोजीच्या राष्ट्रपतींच्या पहिल्या आदेशात आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत संस्थेने वेळोवेळी सुधारणा केलेल्या अनुसूचित जमातीच्या याद्या सूचीबद्ध केलेल्या आहेत त्यामध्ये बंजारा अशी नोंद नाहीत त्यात आम्ही कुणालाही घुसखोरी करू देणार नाही अशा शब्दात कडाडून विरोध केला आदिवासी आरक्षण बचाव एल्गार मोर्चाचे संपूर्ण नियोजन करून कोणत्याही व्यक्तीला गालबोट न लागता हा मोर्चा सुधाकर मेंगाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडला हिवरे बर्डे विलास मोरे गोरख नाईक रमेश माळी सोनू पवार सुधाकर मेंगाळ पांडू कडाळे गंगाराम आगिवले तुकाराम मधे सखाराम भूतांबरे शिवराम मेंगाळ विठ्ठल मेंगाळ कचरू सावंत राजू आगिवले दुबळीराम पथवे रघुनाथ मेंगाळ रघुनाथ कातवरे यशोदा कातवारे लता भूतांबरे बुधाबाई पोकळे बबन कातवारे बाळू मधे कुणाल मेंगाळ रंगनाथ मेंगाळ गणपत पारधे सोमीनाथ मेंगाळ रतन मधे रावजी पथवे अंबादास मोरे राजीव निकम वंदना मेंगाळ संगीता पथवे अल्का मेंगाळ भावडू मेंगाळ सरिचंद दोरे सुखदेव कातवारे अशोक माळे विशाल पवार सुनिल माळे गोपीनाथ मधे रवींद्र फोडसे साईनाथ मेंगाळ जगन्नाथ आगिवले वाळूबा मेंगाळ बाळू पथवे सुनील मेंगाळ विनायक मधे सुभाष मधे कैलास मधे महादू मेंगाळ यांच्यासह आदिवासी ठाकर भिल्ल व पारधी समाजातील महिला पुरुष हजारोंच्या संख्येने उपस्थित होते तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी निवेदन स्वीकारून आपल्या मागण्या आणि भावना तात्काळ सरकारपर्यंत पोहोचवण्याची आश्वासन दिले यावेळी पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५


## युवकांनी आपले आदर्श कोण तपासा आणि कष्टला प्रयत्नाची जोड द्या तुम्हीच तुमच्या यशाचे शिल्पकार व्हाल : प्रा. डॉ. प्रीती शिंदे



**मुरूम (सुधीर पंचगल्ले) :** आजची पिढी आपला हिरो किवा आदर्श कोणाला मानतात हे कळतच नाही. त्यासाठी आपले आदर्श कोण हे तपासायला पाहिजे. तरच कष्ट करायची जाणीव होईल. आणि त्या कष्टाला सरावाची आणि प्रयत्नाची जोड दिली तरच युवक स्वतःच स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार बनतील. प्रचंड कष्ट करण्याची तयारी, प्रयत्नातील सातत्य आणि वाचनाचा सराव हे चार आधारस्तंभ युवकांना स्वतःच त्यांचे जीवन घडवण्यासाठी शिल्पकार म्हणून तयार करतील असे मत वारणानगर येथील प्रा. डॉ. प्रीती शिंदे यांनी व्यक्त केले. शनिवार दिनांक 27 सप्टेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित कर्मयोगी श्रीधररावजी मोरे व्याख्यानमालेचे दुसरे पुष्पगुंफताना त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. सुभाषराव वाघमोडे होते. प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव याची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. प्रीती शिंदे म्हणाल्या की जीवन सुंदर आहे आणि ते अधिक सुंदर घडविण्यासाठी युवकांना स्वतःला शिल्पकाराची भूमिका पार पाडावी लागेल, त्यासाठी प्रचंड कष्टाची तयारी ठेवून प्रयत्नातील सातत्य हेच तुम्हाला ध्येय सिद्धी पर्यंत पोहचवू शकतात. कष्टाच्या घामाने आंघोळ करणारा माणूस स्वतःचे जीवन घडवू शकतो. अध्यक्षिय समारोप करताना डॉ. सुभाष वाघमोडे यांनी समाज परिवर्तनासाठी वैचारिक प्रबोधनाची गरज यावेळी त्यांनी व्यक्त केली. उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, डॉ. अशोक पदमपल्ले, शहरातील नागरिक, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज ईटले यांनी केले तर डॉ. डी. बी. ढोबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## श्रीकृण महाविद्यालयात हिन्दी पखवाडा समापन समारोह



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात आज हिंदी भाषेच्या पंधरवडा कार्यक्रमाचा समारोप संपन्न झाला. गेली पंधरा दिवस हिंदी भाषेच्या संदर्भाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हिंदी भाषेचा विकास तिचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी विविध स्तरावरून कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हिंदी भाषेचा गोडवा आणि तिचे सौंदर्य काळानुरूप वाढतच गेले आहे. प्रास्ताविकपर भाषणात डॉ.महादेव खोत म्हणाले की," हिंदी .भाषा में समृद्ध साहित्य.और संस्कृती हैं,.जो भारत की विरासत को दर्शाती है! यही उसका सांस्कृतिक धारोहर है ! हिंदी विश्वभर में बोली और समझी जाती है, जिससे भारत की संस्कृती और विचारो को वैश्विक स्तर पर प्रसारित किया जा सकता है ! हिंदी भाषा का महत्व समझने की लिये प्रत्येक वर्ष १४ सीतबर को हिंदी दिवस मनाया जाता है , जो इसकी राजभाषा की रूप में आपणाये जाने की याद दिलाता है! इस दीन को मनाने का उद्देश हिंदी भाषा के महत्व को बढावा देना और उसके प्रति जागरूकता फैलाना है !हिंदी भाषा का महत्व बहुत अधिक है,क्योंकी यह भारत की राजभाषा होने की साथ साथ विश्व में बोली जाने वाली प्रमुख भाषाओमें से एक है, हिंदी ने हमे विश्व मे एक नई पहचान दिलाई है ! और यह भारत की एकता और अखंडता का प्रतीक हैं " कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रारंभी रामधारीसिंह दिनकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक डॉ. महादेव खोत यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. कल्यय्या स्वामी यांची उपस्थिती होती .त्यांनी आपले थोडक्यात विचार मांडले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बालाजी कोनाळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.दिगंबर चव्हाण यांनी मानले.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांच्या अध्यक्षीय समारोपानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## कालिकादेवी विद्यालय कबड्डी स्पर्धेत तालुक्यातून प्रथम



**शिरूर (कासार) :** 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.यांच्या अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद गटशिक्षण कार्यालय, शिरूर (का.)ता.शिरूर (का.)जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने,भगवानबाबा विद्यालय बावी,ता. शिरूर (का.) येथे तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.ही शालेय कबड्डी स्पर्धा वयोगट १४ व १९ वर्षाखालील मुलींसाठी होती.या स्पर्धेमध्ये कालिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार मुलींच्या संघाने १४ व १९ वर्ष वयोगटातील दोन्ही संघाने 'प्रथम क्रमांक' पटकावला.या शालेय कबड्डी स्पर्धेत जिंकलेल्या स्पर्धकांची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या शालेय स्पर्धेत तालुक्यातील अनेक नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या मुलींच्या संघाने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली आहे आहे. विद्यालयामधील,क्रीडा शिक्षक श्री रविंद्र बडे व प्रा.बाळासाहेब खटाणे यांनी मुलींच्या कबड्डी स्पर्धेची तयारी अतिशय मेहनतीने करून घेतली होती.यामुळे विद्यालयातील मुलींच्या संघाने तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून तालुक्यामध्ये कालिकादेवी विद्यालयाचे नाव लौकिक केले आहे.यामुळे कालिकादेवी विद्यालयातील कबड्डी स्पर्धेतील स्पर्धकांना जिल्हास्तरीय स्पर्धेत जाण्याचा मान मिळाला आहे.तेव्हा आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर, मा.रोहीत (दादा) क्षीरसागर, प्रशासन अधिकारी मा.डॉ.राजू मचाले,सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार, कार्यवाहक मा.एम.ए.राऊत,प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, परिसरातील क्रीडाप्रेमी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५

# ज्ञानेश्वर विद्यालयाचा राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत द्वितीय क्रमांक



**बेगमपुरा :** येथील ज्ञानेश्वर विद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यालयाच्या कै.पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ सभागृहात या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.दिनांक २७ सप्टेंबर, वार शनिवार रोजी हा उत्सव पार पडला. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती संध्या मोरे, पर्यवेक्षक श्री संभाजी तांगडे आणि ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.उत्सवादरम्यान पारंपरिक नृत्ये, गरबा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांनी उत्सवाचा मनमुराद आनंद घेतला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे आणि योग्य मार्गदर्शनामुळे हा नवरात्र उत्सव यशस्वीरित्या पार पडला, अशी माहिती विद्यालयाच्या वतीने देण्यात आली.




# पाऊस पडला, आठवणीत रंग झाल्या अभंग, पाऊसधारा



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** उमरगा शहर व परिसरात अतिवृष्टीचा तडाखा चालूच आहे... घरही पाण्यात....आणि शेतीही पाण्यात.....जिकडे तिकडे चोहीकडे.....पाणीच..पाणी.....तालुक्यात सतत दोन आठवड्याच्या मुसळधार पावसानंतरही पाऊस कोणतीही दया माया दाखवायला तयार नाही की माघार घ्यायला तयार नाही..शेतकरी माझा जागाच आहे....पुढाऱ्यांनाही झोप तरी कशी येईल..सगळ्यांना चिंता एकच...परतीचा पाऊस माघारी कधी जाईल . ..या हंगामात पावसाने पावसाचे सर्व कांहीं संकेत अन् संदर्भ काळेकभिन्न करून टाकले....सारेच संदर्भ बदलून टाकले....परिस्थिती बदलली....शेती बदलली मग माणसं आणि मनस्थिती तरी कशी बदलणार नाही... विराण वाळवंट आपण बघितली..पण विराण पाणी कधी बघितलं नव्हतं...नुकतेच भारतीय हवामान विभागाने सोलापूर ..लातूर..बीड...आणि धाराशिव तर रेड अलर्ट जारी करण्यात आले.अनेक पूरस्थितीनियंत्रण कक्षाच्या व अनेक पाणीप्रकल्पाच्या सूचना देऊनही झाल्या.पण बरसणारा पाऊस आणि तरसणारा शेतकरी यांच्या भावविभांवाचे संसूचन कोण करणार....शेतकऱ्यांच्या अश्रूंचा बांध कोण थोपविणार...रिमझिम बरसणारा पाऊस,पावसाळी वातावरण,चिंब पाऊस,पावसाळी मन झिंगतानाचा पाऊस,मखमली पाऊस,असा हवाहवासा वाटणारा पाऊस ,हिरव्यागार पालवीवर टपटपपणारा पाऊस,मनात रुंजी घालणारा पाऊस,झिंग आणणारा पाऊस,प्रियकर आणि प्रियसीचा भिजू घालणारा पाऊस या कवितेतील साऱ्या संवेदना आजच्या पावसाने निकाली काढून टाकल्या.कधीकाळी असा हवाहवासा वाटणारा पाऊस आज जीवघेणा ठरतोय.शासन,प्रशासन,नियोजन आणि मदतीची हतबलता आणि सामान्यजनांचा आक्रोश,शेतकऱ्यांचे उध्वस्थलेपण ,कुणापुढे आणि कसे मांडायचे हा यक्षप्रश्न घेऊन ..भळभळणाऱ्या दुःखाला आणि वेदनेला .. टाके कसे घालावयाचे..हीच एक चिंता आणि हेच एक एकारलेपण सर्वांना सतावतेय..अस्वस्थ करतेय....खरीप हंगामाच्या पिकाची नासाडी, अन् बागायत क्षेत्राला बसलेला अभूतपूर्व फटका शेतीच्या शेवटच्या घटका मोजत आहे.मोठ्या कष्टाने संवर्धित केलेली पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्याच्या अश्रूच्या बांधाला मदतीचा खांदा द्यायला कुणीही तयार नाही....इतका पाऊस की कधी नव्हे ती तालुक्यातील सर्वच लहान मोठे तलाव ओतप्रोत भरून ओसंडून वहायच्या मार्गावर आहेत.रस्ते बंद झाली.. वाटा बंद झाल्या..एकरी किती हजार अनुदान मिळेल..कधी मिळेल..पंजाबला मिळाले..आपल्यालाही मिळेल.. पंजाबच्या तुलनेत आपली लोकसंख्या जास्त ..मग अनुदानही जास्त..अशा आशेवर आपल्या स्वप्नांची आरास मांडून स्वतःच ..स्वतःच्या मनावर फुंकर घालत बसलेला शेतकरी पाहून मन उचलंबून आल्याशिवाय राहत नाही..त्यातल्या त्यात केसरजवळगा साठवण तलाव,रामनगर, कोराळ, मुरळी सुपतगाव,तळमोडवाडी साठवण तलाव,पेठसांगवी लघु पाझर तलाव,कुन्हाळी लघु पाझर तलाव,दगडधनोरा,भिकारसांगवी तलाव,बेनितुरा मध्यम प्रकल्प,कोरेगाव लघु पाझर तलाव,तुरोरी मध्यम प्रकल्प,वागदरी,नारंगवाडी, सरवाडी साठवण तलाव, कोळसुर लघु पाझर तलाव असे अनेक तलाव व लघुप्रकल्प पुरा क्षमतेनिशी भरलेले आहेत..आजही संततधार पाऊस चालूच असून अश्याच पूर्ण क्षमतेने शासन मदत करेल काय या विवंचनेत शेतकरी चिंताग्रस्त झालेले आहेत....अख्खे पिकं पोटात घेऊन अथांग पाणी शेतभर पसरलेले आहे...त्यामुळे "पाऊस पडला ,आठवणीत भंग झाले सर्वच झाले दंग,आयुष्यात "...अशीच कांहीं अवस्था झाली आहे..ही भीषणता पाहून अनेक शेतकऱ्यांनी गळफास घेतला..धरण बांधून ,मरण कांडणाऱ्या यंत्रणांना त्याचे काय....त्याची नुसती बातमीही नाही.. अन् मदतही नाही...शेतकऱ्यांचा वाली कोणी आहे का नाही...असे म्हणायची वेळ आली आहे.. खरं तर महिनाभरापासून या भागात पावसाने हाहाकार उडवून दिला आहे..शेताच्या पोटात हातातोंडाशी आलेले पिक शेतात उभे आहे..मात्र सर्वत्र पाण्याचा वावर..घरात पाणी..शेतात पाणी..नदी,नाले,तलाव,रस्तेसुद्धा तुडुंब भरलेले आहेत..शेतकऱ्याची अक्षरशः तारांबळ उडालेली आहे..अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या बनमी,गंजी,ताडपत्री, चबाळ,असे राशीचे सर्व साहित्य शेतात कुजत पडले आहेत..कित्येकांच्या मारून ठेवलेल्या बनमी पाण्यावर तरंगू लागल्या आहेत...एवढी विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे.....स्वप्नवत वाटणारा हा स्वप्नातला पाऊस आज वास्तव बदलऊन टाकतोय..आयुष्य बदलून टाकतोय...असा संदर्भ बदलून टाकणारा संदर्भहीन पाऊस की आणखी कांहीं, सर्वांच्या मनात धडकी भरवणारा जालीम पाऊस.. मूग गेले, उडीद गेल, सोयाबीन गेलं, तूर गेल्यात जमा आहे.पीक घ्यायचं तरी कशाचं पाण्याचं की अश्रूंच....हवालदिवाल झालेला शेतकरी, दुःखाचा सांडवा अन् संवेदनाचे दरवाजे किती म्हणून उघडायचे..जाणिवांचे कवच शेतकऱ्यांची ही विपन्नावस्था थांबवू शकेल का...मदतीचा कोरडा ओघ , होणारी ही जीवितहानी व वित्तहानी टाळू शकेल काय..विस्कटलेली ही घडी अन् विस्कळीत झालेले हे जीवन पूर्वपदावर येणार काय...आणि सहनशीलतेचा हा महापूर कुठे आणि कधी थांबणार..... की आक्रंदन अन् हाहाकार, आक्रोश अन् स्थितीशीलता हातात हात घालून पाण्याच्या प्रवाहाच्या दिशेने अशीच वाहत राहणार.... कोरड्या मनातील हा ओला दुष्काळ भरून तरी कसा काढायचा...हाच मोठा प्रश्न आहे....!!

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५

# स्मार्ट मीटर कुठेही बसवणार नसल्याचा मुख्यमंत्री फडणवीस यांचा निर्वाळा असताना वरिष्ठ अधिकारी दिशाभुल करत आहेत- डॉ राजेंद्र दाते पाटील





**प्रतिनिधी (मुंबई)** : टी ओ डी तथा स्मार्ट मीटर राज्यभरात रद्द करून न्याय द्यावा अशी जोरदार जनहिताची मागणी शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील मुख्यमंत्र्या कडे केली असता या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांचे कडे पुढील कारवाई साठी पाठवला आहे. मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल ! स्मार्ट मीटर कुठेही बसवणार नसल्याचा मुख्यमंत्री फडणवीस यांचा निर्वाळा असुन तशी कबुलीच एका सादरीकरणात स्पष्ट होत असताना ही काही अधिकारी अधिकची दिशाभुल करण्याचे काम करीत असुन नव्याने ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे मांडावी लागेल असेही डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले.याच प्रमाणे त्यांनी महत्त्वपूर्ण मागणी मुख्यमंत्री यांचे कडे केली होती त्यात सुध्दा त्यांनी नमुद केले होते की,५०० युनिट पर्यंत वीज बील माफ करावे आणि याची योग्य ती दखल घेऊन हा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी साठी आता प्रस्ताव उर्जा विभागाकडे पाठवला आहे. ५०० युनिट पर्यंत वीज बील माफ करावे व टी ओ डी मीटर राज्यभरात रद्द करून न्याय द्यावा अशी जोरदार जनहिताची मागणी शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील मुख्यमंत्र्या कडे केली असता या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांचे कडे पुढील कारवाई साठी पाठवला आहे हे अत्यंत महत्वाचे ठरत आहे. जनहितार्थ अत्यंत अभ्यासु निवेदन खास बाब म्हणजे आपल्या अत्यंत अभ्यासु निवेदनात शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केलेले आहे की,अगदी सुरुवाती पासुनच स्मार्ट मीटर ,टीओडी मीटर बसवण्या च्या प्रक्रिया साठी देशभरासह संपुर्ण महाराष्ट्र विरोध करीत असुन कमी वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना पहिल्या वर्षी १० टक्के सवलत,स्मार्ट मीटर वापरणाऱ्यांना दिवसा वीज वापरावर अतिरिक्त १० टक्के टीओडी लावण्याचे धोरण नागरिकांना वेठीस धरणारे ठरणार असल्याचे त्यांनी नमुद करून हा प्रश्न उपस्थित केला की,जर का हरित ऊर्जा खरेदी तून आगामी ५ वर्षांत वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर वीजदरात ५०० युनिट पर्यंत सामाईक(युनिफॉर्म) उपाय योजना का केल्या जात नाही ? असा परखड सवाल उपस्थित करून १०० पासुन ३०० युनिट पर्यंत फक्त सहा पैशांची सवलत याला कशाचे द्योतक म्हणावे ?असा जळजळीत सवाल देखील डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता.राज्यात पहिल्यांदाच घरगुती,औद्योगिक, व्यावसायिक वीजदर पहिल्या वर्षी १० टक्के आणि पाच वर्षांत २६ टक्के कमी होणार आहेत.महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने(एमईआर सी) महावितरणच्या याचिकेवर दिलेल्या आदेशा मुळे सध्या असलेले १०१ ते ३०० १३.२३ रुपये २०२५- २०२६ मध्ये १३.१७ होतील तर सध्याचे ३०१ ते ५०० युनिट १७.७८ एवढी असून ती २०२५-२०२६वर्षात १७.५६ एवढी होणार तर ५०० युनिट च्या पुढील सध्या १९.२३ रुपये तर वर्ष २०२५- २०२६ या वर्षात १९.१५ म्हणजे फक्त आठ पैशांचा फरक असणार आहे आणि हीच बाब शासनाची काय दृष्टी आहे हे अभिप्रेत करणारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.पुढे डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले होते की, राज्यातील महावितरण कंपनीने वीजदर कमी करण्यासाठी याचिका केली.त्यावर एमईआरसीने जो आदेश दिला आहे तो मुळात व्यापक हिताचा ठरतच नसुन या आदेशाचा लाभ घरगुती वापर करणाऱ्या १०० युनिटच लक्षात घेत औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना हा लाभ होताना भरीव फायदा थेट दिसतच नाही. पुढे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले होते की,महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी सांगितले प्रमाणे स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरा साठी दहाटक्के अतिरिक्तटीओडी सवलत व सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये सिद्धच होत नाहीत.आगामी पाच वर्षांत जर का महावितरणचे वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर त्याचा फायदा सर्वच ग्राहकांना भरीव स्तरावर का नाही ? हा महत्वाचा सवाल डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता व नमुद केले होते की, सन २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीज खरेदीचे करार केले.त्यापैकी २ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून मिळणार आहे असे असेल आणि ती अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्यास पाच वर्षांत ६६ हजार कोटी रुपये वाचण्याच्या दाव्याचा फायदा सर्व सामान्य विद्युत ग्राहकांना का नाही ? असे ही त्यांनी नमुद करून महावितरणने मुंबईतील काही भागात तर अदानी व टोरेंट या खासगी वीजकंपन्यांनी एकमेकांच्या परवाना क्षेत्रात वितरण परवाना मिळविण्या साठी आयोगापुढे याचिका सादर केल्या आहेत त्या काही जनहिता साठी अजिबात नाही. पुढे डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी अत्यंत मुद्देसुद निवेदन केले असुन आयोगाने २९ मार्च रोजी एक एप्रिल पासूनचे नवीन वीजदर जाहीर केले होते. महावितरणने ४८ हजार कोटी रुपयांची तूट येणार असल्याने वित्तीय ताळेबंदातून आयोगापुढे मांडण्यात आले होते व त्यानुसार महसूल वाढ देण्याची मागणी महावितरणने केली होती हे कशाच्या बळावर मांडले होते हा देखील अनुत्तरित सवाल आहे. राज्य शासनाने अधिक जनहिताच्या बाबीवर विचार करून सर्वसामान्य ग्राहकांच्या हितासाठी ५०० युनिट पर्यंत वीज बील माफ करण्याची भुमिका घ्यावी आणि एकंदरीत या निकालाचा अधिकचा व्यापक विचार करून सामान्य गोरगरीब आणि शेतकरी यांच्या उत्पन्नाचा अधिक बारकाईने विचार करून पुनर्विचार करावा आणि टी ओ डी मीटर लावण्याची प्रकिया रद्द करून ५०० युनिट पर्यंतचे विद्युत बील कायम स्वरुपी माफ करावे अशी जोरदार मागणी शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केली असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदरची बाब पुढील कारवाई साठी या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आभा शुक्ला यांचे कडे पाठवुन न्याय देण्याचे कार्य हाती घेतले असल्याचे दिसुन येत असुन तसेच खाजगी कंपन्यांना

परवान्यामुळे मनमानी वाढेल म्हणून या कंपन्यांना वीज वितरणाचा परवाना मंजूर झाल्यास शासनाच्या महावितरण कंपनीस दुय्यम स्थान प्राप्त होईल आणि खाजगी कंपन्यांची मनमानी वाढुन कालांतराने प्रचंड वीज बीलवाढ होऊन सर्वसामान्य लोकांना आर्थिक भुर्दंड वाढणार आहे ही अत्यंतअभ्यासु बाब त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्षात आणुन देत नमुद केले होते की, विद्युत निर्मिती जरी खाजगी कंपन्यांनी केली तरी वितरण व्यवस्था

फक्त आणि फक्त महावितरण कंपनी कडेच असावी त्या स्थितीत कोणाची वीज घ्यायची किंवा कुठल्या कंपनीचे वीज मीटर घ्यायचे ही सक्ती वाढेल म्हणुन जनहितार्थ हा होऊ घातलेला निर्णय शासनाने तत्काळ अमान्य करून रद्द करावा अशीही मागणी राज्याच्या मुख्यमंत्र्यां कडे शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी केली असता विषयाचे गांभीर्य त्यांनी लक्षात घेतल्याचे स्पष्ट होत आहे. या बाबत त्यांना मुख्यमंत्र्यांचा मेल प्राप्त झाला असल्याची बाब महत्वाची ठरत आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन विशेषांक भित्तिपत्रकाचे विमोचन



**छत्रपती संभाजीनगर** : येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व भय्यासाहेब आंबेडकर या दोन भित्तिपत्रक विशेषांकांचे विमोचन प्राचार्य डॉ. आर .व्ही. मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. आजीवन शिक्षण विस्तार विभागातील विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यानिमित्त रवी सभादिंडे व विकास कांबळे यांनी या विशेषांकात मराठवाड्यातील मुक्तिसंग्राम, संघर्ष, स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान या विषयी माहिती संकलित केली आहे तसेच भय्यासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर राशी पंडित, मयुरी वाघमारे,प्राची काळे, सलोनी जैस्वाल,आर्यन गोडबोले,ऋषीकेश नवले यांनी भय्यासाहेब आंबेडकर यांच्यावरील माहिती , कार्य व कर्तृत्व या विषयावर माहिती भित्तिपत्रक विशेषांकात दिली आहे. यावेळी प्राचार्य डॉ. आर.व्ही. मस्के व उपप्राचार्य एन.एम .करडे यांनी मार्गदर्शन केले , या कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. नवनाथ गोरे यांनी केले तर आभार डॉ. गौतम घाडगे यांनी व्यक्त केले.यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५

# नवदुर्गा

नवदुर्गेचे नऊ रूप
आदिशक्तीचे ते स्वरूप

शैलपुत्री, ब्रह्मचारिणी,
चंद्रघंटा, कुष्मांडा,
स्कंदमाता, कात्यायनी
कालरात्रि, महागौरी, सिद्धिदात्री,
शास्त्र सांगे आदिशक्तीचे नऊ अवतार
नवदुर्गाचे नऊ अवतार
नवदुर्गेचे नऊ रूप
आदिशक्तीचे ते स्वरूप

स्नेहमयी दुर्गा ,जननी दुर्गा
आशीर्वादिनी दुर्गा,
सखा दुर्गा ,गृहलक्ष्मी दुर्गा
समाजसेवी दुर्गा
आरोग्यमाता दुर्गा ,कर्तव्यनिष्ठ दुर्गा
स्वच्छता दुर्गा,
नवयुगाच्या नवस्वरुप नवदुर्गा
नवदुर्गेचे नऊ रूप
आदिशक्तीचे ते स्वरूप

नव्या युगाच्या आदिशक्तीचे
स्वरूप नवदुर्गाचे
क्षण नऊ दिवसाचे
भाग्य नशीबी तीच्या
नऊ दिवस नवरात्रीचे
बाकी दिवस सारा
सांभाळे संसार

आई,आजी, लेक, बहिण, बायको,
गृहिणी, समाजसेविका,आरोग्य सेविका
नोकरदार, सफाई कामगार
पुरुषप्रधान सेवेला न्याय देत
जन्माचे भोग झेलत झेलत
कुटुंबासाठी जगत असते
नवदुर्गेचे नऊ रुप
आदिशक्तीचे ते स्वरूप

**लक्ष्मण वाल्डे -कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**

# युद्ध बाकी

जीवनाच्या युद्ध भूमीवर खुप लढाया लढलो
काही जिंकलो काही हरलो युद्ध बाकी आहे

कोण आपलं कोण परकं
अनुभव सांगतो आहे
एक एक पाऊल मात्र
जपून टाकतो आहे

हरलो आता युद्ध सारे जग समजते आहे
अपयशाचे माकड काळे उगाच हसते आहे

जिंकण्याची आस उरी
अजुन लढतो आहे
हरणारे जिंकू शकतात
नवा पायंडा पाडतो आहे

योद्धा मी कर्मभूमीचा प्रयत्नवाद जपतो आहे
एकच ध्यास जिंकण्याचा मनी फुलतो आहे

ज्ञानेश्वर गायके, कन्नड

# राजा राममोहन रॉय : भारतीय समाजसुधारणेचा दीपस्तंभ

**भा**रतीय इतिहासाच्या प्रवाहात काही व्यक्तिमत्त्वे अशी घडलेली आहेत, ज्यांनी समाजाला नव्या दृष्टीकोनातून पाहण्याची शिकवण देऊन रूढीवादी मानसिकता आणि अंधश्रद्धा दूर करण्याचा मार्ग दाखवला आहे. त्या काळातील भारतीय समाज धार्मिक कुसंस्कार, जातीभेद, स्त्रीविरोधी प्रथा आणि शिक्षणाच्या अभावाने जड होत होता. अशा वातावरणात राजा राममोहन रॉय या दूरदर्शी विचारवंताचा जन्म झाला. त्यांनी आपल्या बुद्धी, धैर्य आणि अपार तर्कशक्तीच्या बळावर भारतीय समाजाला आधुनिकतेच्या मार्गावर नेले. म्हणूनच त्यांना भारतीय पुनर्जागरणाचे जनक असे संबोधले जाते. २७ सप्टेंबर रोजी त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे आजही आवश्यक आहे.

**बालपण आणि शिक्षण :-**

२२ मे १७७२ रोजी बंगाल प्रांतातील हुगळी जिल्ह्यातील राधानगर या खेड्यात राजा राममोहन रॉय यांचा जन्म झाला. त्यांचे वडील रामकांत रॉय जमीनदार होते आणि आई तारिणी देवी धार्मिक आणि विचारशील व्यक्तिमत्त्वाची होती. बालवयातच राजा राममोहन रॉय अतिशय जिज्ञासू, बुद्धिमान आणि अभ्यासू होते. त्यांनी संस्कृत, फारसी आणि अरबी यांसारख्या पारंपरिक भाषांचा अभ्यास केला. पुढे इंग्रजी, ग्रीक आणि हिब्रू यासारख्या पाश्चात्य भाषाही आत्मसात केल्या. या भाषिक प्राविण्यामुळे त्यांना हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास करता आला. उपनिषदांचे गहन अध्ययन, कुराणातील तत्त्वज्ञान, बायबलमधील नैतिकता यांचा अभ्यास करून त्यांनी स्वतःची स्वतंत्र आणि तर्कशुद्ध विचारसरणी विकसित केली.

**अंधश्रद्धा आणि जड परंपराविरुद्ध संघर्ष :-**

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय समाज अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, मूर्तिपूजा आणि धर्मांधतेमध्ये अडकलेला होता. या परिस्थितीत समाजात बदल घडविण्याचे काम अतिशय कठीण होते. राजा राममोहन रॉय यांनी या सर्व जडतेला आव्हान दिले. उपनिषदांवर आधारित एकेश्वरवादाचा प्रचार करून त्यांनी धर्माचे खरे स्वरूप लोकांपर्यंत पोहचवले. त्यांचा ठाम विश्वास होता की ईश्वर एकच आहे आणि त्याला जाण्याचा मार्ग सत्य, प्रामाणिकता आणि नैतिकतेतून जातो. मूर्तिपूजा, जातिव्यवस्था किंवा कर्मकांड यांचा खऱ्या धार्मिकतेशी काहीही संबंध नाही.

**सतीप्रथेविरुद्ध निर्णायक लढा :-**

भारतीय समाजातील सर्वात अमानुष प्रथा म्हणजे सतीप्रथा, ज्यात पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला जिवंत जाळण्यात येत असे. समाजाने ही प्रथा धार्मिक कर्तव्य मानली होती. राजा राममोहन रॉय यांनी याविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी धार्मिक ग्रंथांचे सखोल अध्ययन करून सिद्ध केले की सतीप्रथा वैदिक दृष्टिकोनातून धर्मसिद्ध नाही. त्यांनी लेख, भाषणे, समाजजागृती आणि इंग्रज प्रशासनाकडे अर्ज करून लोकांना पटवले की ही प्रथा स्त्रीविरोधी आणि अमानुष आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे १८२९ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिक यांनी सतीप्रथा बंदीचा कायदा जाहीर केला. या निर्णयामुळे भारतीय स्त्रियांना जिवंत राहण्याचा अधिकार मिळाला आणि समाजसुधारणेच्या इतिहासात हा क्षण एक ऐतिहासिक टप्पा ठरला.

**स्त्रीशिक्षण आणि स्त्रीसक्षमीकरण :-**

राममोहन रॉय यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांच्या मते, समाजाची खरी प्रगती स्त्रीशक्तीशिवाय शक्य नाही. त्या काळात स्त्रियांना शिक्षणाची संधी नव्हती, त्यांचे जीवन घराच्या चौकटीत मर्यादित होते, आणि विधवांचे जीवन अत्यंत दुःखदायक होते. राजा राममोहन रॉय यांनी स्त्रियांचे हक्क, बालविवाहविरोध, विधवाविवाह यांसारख्या सामाजिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी मुलींसाठी शाळा उघडल्या, स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रसार केला, विधवाविवाहाला प्रोत्साहन दिले आणि सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजात स्त्रीशिक्षणाची बीजे रुजली आणि स्त्रीसक्षमीकरणाची सुरुवात झाली.

**शिक्षणातील क्रांतिकारी योगदान :-**

राममोहन रॉय यांचा विश्वास होता की शिक्षणाशिवाय समाज प्रगत होऊ शकत नाही. पारंपरिक शिक्षण केवळ धार्मिक ग्रंथांपुरते मर्यादित होते. त्याने आधुनिक विज्ञान, तर्कशास्त्र, इतिहास, गणित यांचा अभाव होता. राममोहन रॉय यांनी इंग्रजी माध्यमातून शिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांनी कलकत्त्यात इंग्रजी शाळा स्थापन केली, हिंदू कॉलेजमध्ये योगदान दिले, तसेच विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञानाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षणामुळे भारतीय तरुणांना जागतिक ज्ञानाशी जोडले जाईल आणि समाजात नवीन विचारांची ऊर्जा निर्माण होईल, असा त्यांचा विश्वास होता.

**ब्रह्म समाज आणि धार्मिक सुधारणे :**

१८२८ मध्ये त्यांनी स्थापन केलेला ब्राम्हो समाज एकेश्वरवाद, सामाजिक समानता, स्त्रीसक्षमीकरण आणि धार्मिक सहिष्णुतेवर आधारित होता. ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून मूर्तिपूजा, जातिव्यवस्था आणि अंधश्रद्धा यांचा विरोध केला गेला. स्त्रियांच्या शिक्षणाचे, विधवांच्या हक्कांचे, धार्मिक उदारमतवादाचे संदेश या समाजातून प्रसारित झाले. ब्राम्हो समाजाने भारतीय समाजात सुधारणा घडवून आणण्याचे संघटित स्वरूप दिले आणि पुढील सुधारकांसाठी प्रेरणास्थान ठरले.

**पत्रकारितेत योगदान :-**

राजा राममोहन रॉय यांनी पत्रकारितेतून विचारप्रसार केला. त्यांनी 'संवाद कौमुदी' आणि फारसी नियतकालिक 'मिरात-उल-अखबर' सुरू केले. या माध्यमातून त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्रीविरोधी प्रथा, शिक्षणाचा अभाव यावर लेखन केले. ब्रिटिश प्रशासनाच्या अन्यायकारक धोरणांचा निषेध त्यांनी या माध्यमातून केला. त्यांच्या पत्रकारितेने भारतीय समाजात जनमत घडवले आणि सुधारणा घडवण्यास चालना दिली.

**ब्रिटिश प्रशासनाशी संबंध :-**

राममोहन रॉय यांचे ब्रिटिश सत्तेशी नाते जटिल होते. एकीकडे त्यांनी इंग्रजांच्या आधुनिक शिक्षणाचे स्वागत केले, आधुनिक विज्ञान आणि तर्कशास्त्राचा प्रसार केला, तर दुसरीकडे त्यांनी शोषणकारी धोरणांचा निषेध केला. भारतीयांना न्यायालयीन साक्षीदार म्हणून मान्यता मिळावी, मालमत्तेवरील हक्क मिळावेत यासाठी त्यांनी ब्रिटिश प्रशासनाकडे अर्ज केले. १८३० मध्ये ते इंग्लंडला गेले आणि तिथे भारतीय समाजाचे प्रश्न मांडले. त्यांनी ब्रिटिश जनतेसमोर भारतीयांच्या हक्कांची बाजू मांडली आणि जागतिक स्तरावर भारतीय समस्यांकडे लक्ष वेधले.

**अंतिम वर्षे आणि निधन :-**

इंग्लंडमध्ये कार्यरत असतानाच २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टल येथे राममोहन रॉय यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने भारतीय समाजाने एक महान सुधारक गमावला, पण त्यांच्या विचारांचे तेज आजही समाजाला मार्गदर्शन करते. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाला आधुनिक शिक्षण, स्त्रीसक्षमीकरण, धर्मसहिष्णुता आणि तर्कशुद्ध विचार यांचा साक्षात्कार झाला.

**वारसा आणि आधुनिक संदर्भ :-**

राममोहन रॉय यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात आधुनिकतेचे बीज रुजले. स्त्रीसक्षमीकरण, धार्मिक उदारमतवाद, शिक्षणाचा प्रसार, अंधश्रद्धाविरोधी चळवळ आणि पत्रकारितेत स्वातंत्र्य या सर्व गोष्टींमध्ये त्यांचा ठसा आजही दिसतो. त्यांच्या विचारांचा प्रभाव केवळ बंगाल किंवा भारतापुरता मर्यादित नाही; तो जागतिक स्तरावर भारतीय समाजाच्या सुधारणा प्रवाहात देखील महत्त्वाचा ठरतो. आजच्या काळात स्त्रीशिक्षण, लिंगभाव समानता, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय यावर जे काम चालू आहे, त्यामागे राममोहन रॉय यांच्या दूरदर्शी विचारांचा प्रभाव आहे.

**निष्कर्ष :-**

शेवटी, असे म्हणता येईल की, राजा राममोहन रॉय हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांनी ज्या काळात कार्य केले, त्या काळात त्यांचे विचार क्रांतिकारी होते. सतीप्रथा बंद करणे, स्त्रीशिक्षणाला चालना देणे, बालविवाह व बहुपत्नीत्व विरोधी चळवळीला पाठबळ देणे, ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून धार्मिक उदारमतवादाचा प्रचार करणे, इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करणे आणि पत्रकारितेचा प्रभावी वापर करणे, हे सर्व त्यांच्या दूरदर्शी कार्याचे ठळक उदाहरणे आहेत. २७ सप्टेंबर रोजी त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त आपण त्यांचे स्मरण करतो, त्यांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवतो आणि समाजातील विषमता, अन्याय व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांच्या विचारांची प्रेरणा घेतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**ईमेल –**
bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002